मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विधानसभा निवडणुकीचं बिगुल वाजलं!

## 20 नोव्हेंबरला मतदान, 23 नोव्हेंबरला मतमोजणी : आजपासून आचारसंहिता लागू

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रात एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहे. २० नोव्हेंबरला एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहेत. तर २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी ही माहिती दिली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तारीख आणि निकाल या दोन्हीची तारीख जाहीर झाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज ही घोषणा केली. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात निवडणूक कधी जाहीर होणार? याची चर्चा रंगल्या होत्या. काही दिवसांपूर्वी राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेतल २६ नोव्हेंबरच्या आधी निवडणूक घेतली जाईल असं म्हटलं होतं. आज अखेर या निवडणुकीची आणि निकालाच्या दिवसाची घोषणा झाली आहे.




जम्मू आणि काश्मीर येथील मतदारांनी निवडणुकीचा उत्सव उत्तम प्रकारे साजरा झाला. याबद्दल मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी मतदारांचे आभार मानले. आज आम्ही महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणूक ) कार्यक्रम जाहीर करत आहोत. महाराष्ट्रात एकूण ९.६३ कोटी मतदार आहेत, त्यापैकी ४.९८ कोटी पुरुष मतदार आहेत तर ४.६६ कोटी महिला मतदार आहेत. अशी माहितीही राजीव कुमार यांनी दिली.

आम्ही काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचा दौरा केला होता. त्या दौऱ्यादरम्यान आम्ही निवडणुकीची तयारी योग्य प्रकारे झाली आहे की नाही? याची माहिती आम्ही घेतली. लोकसभा निवडणुकीच्या

### विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक

- » आचारसंहिता सुरू : १५ ऑक्टोबर
- » अधिसूचना : २२ ऑक्टोबर
- » अर्ज भरण्याचा शेवट : २९ ऑक्टोबर
- » अर्ज छाननी : ३० ऑक्टोबर
- » अर्ज माघार घेणे : ०४ नोव्हेंबर
- » मतदान : २० नोव्हेंबर
- » निकाल : २३ नोव्हेंबर
- » आचारसंहिता समाप्त : २५ नोव्हेंबर

वेळी काही गोष्टी घडल्या होत्या त्या टाळण्यासाठी आम्ही आता पूर्णपणे प्रयत्न करत आहोत. लोकांची मतदानासाठी रांग लागते त्यावेळी काही अंतरावर खुर्ची किंवा बाक रचण्याचा सल्ला आम्ही दिला आहे. ८५ वर्षे आणि त्यावरच्या मतदारांना घरुन मतदान करता येणार आहे.

तसंच या मतदारांच्या गोपनीयतेची काळजी आम्ही घेऊ त्यासंदर्भातली पूर्ण व्यवस्था आम्ही केली आहे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना त्यांची पार्श्वभूमी तीनवेळा वृत्तपत्रात द्यावी लागेल.

आम्ही जेव्हा महाराष्ट्रात बैठका घेतल्या तेव्हा आम्ही त्यासंदर्भातले कठोर निर्देश आम्ही राज्यआयोग आणि इतर अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. असंही राजीव कुमार यांनी सांगितलं आहे. निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव आहे. त्यात सर्व मतदारांचा सहभाग आवश्यक आहे.

# मी शरद पवारांच्या राष्ट्रवादीतच..!

## विलास लांडेंनी अखेर स्वतः केले जाहीर : भोसरीत महाविकास आघाडीचा आमदार करणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

नेहमी संभ्रमाचे राजकारण करणारे भोसरी विधानसभेचे माजी आमदार विलास लांडे हे नेमकी काय भूमिका घेणार याचा खुलासा स्वतः लांडे यांनीच आज केला आहे. मी शरद पवार यांच्याच राष्ट्रवादीत आहे. विधानसभेसाठी मी इच्छुक नसून येणाऱ्या निवडणुकीत भोसरीतून महाविकास आघाडीचाच आमदार तयार करणार असल्याचे त्यांनी आज जाहीर केले आहे.

विलास लांडे यांनी आज शरद पवार यांची भेट घेतली त्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी चर्चा केली. लांडे म्हणाले की, लपून-छपून मी पवार साहेबांना कधीच भेटलो नाही. शरद पवार हे परिवार आहेत



आणि पवार परिवाराशी आमचा १९८० सालापासून संबंध आहे. राजकारणात काही कमी जास्त होत असतं. शरद पवार साहेब म्हणजे देशातील एक मोठं नेतृत्व आहे. सर्वसामान्यांना बरोबर घेऊन जाणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. त्यामुळे आम्ही आजपर्यंत साहेबांसोबत राहिलो आहोत. आम्ही साहेबांना सोडून आम्ही जाऊ शकत नाही.

येणाऱ्या विधानसभा निवडणुकी संदर्भात आज पवार साहेबांची चर्चा झाली. शिरूर लोकसभा मतदारसंघ आणि पिंपरी चिंचवड शहर या ठिकाणी कोण उमेदवार असावेत त्या संदर्भात त्यांनी चर्चा केली. मविआध्ये एक सूत्र आहे.

# महापालिकेतील रिक्तपदांवर पदोन्नतीने नियुक्ती

## आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पद नव्याने निर्माण करण्यास मान्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका सेवेतून विविध पदांवरील अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. त्या रिक्त पदांवर अधिकाऱ्यांना पदोन्नती देणे आवश्यक होते. त्यांसह आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पद नव्याने निर्माण करण्यास आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली.



महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित आहे. पावसाळ्यात होणारी अतिवृष्टी, पूर परिस्थितीचा पूर्वानुभव, वादळे, संसर्गजन्य रोग, कारखान्यातील अपघात, रस्ते अपघात, इमारतींना आग लागणे, घरांना आग लागणे यासारख्या आपत्तीत जीवित व वित्त हानी मोठ्या प्रमाणात होते. तसेच संसर्गजन्य रोगांचा नागरिकांच्या जिवास मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होतो, यासाठी नागरिकांमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे व आपत्ती परिस्थिती निर्माण झाल्यास प्रतिसाद देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाशी निगडित अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे, बचाव पथक निर्माण करणे आवश्यक साधनसामग्री व माहिती संकलित करून अद्ययावत ठेवण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष पूर्ण क्षमतेने व पूर्ण वेळ कार्यान्वित करणे, आपत्ती संबंधित घटकांचे नियोजन करणे, आपत्तीविषयक बाबी हाताळणे, या अनुषंगाने महापालिकेच्या स्थायी आस्थापनेवर आपत्ती व्यवस्थापन कक्षासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नव्याने निर्माण करण्यात आले आहेत.

# गुरुवारी शहरातील पाणीपुरवठा बंद!

## संपुर्ण शहराला शुक्रवारी 18 ऑक्टोबर उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या शहरातील विविध भागातील जलकेंद्रांची देखभाल दुरुस्ती केली जाणार आहे. गुरुवारी (दि.१७) शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तर शुक्रवारी (दि.१८) सकाळी उशीरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. तरी सर्व नागरिकांनी याबाबत नोंद घेऊन सहकार्य करावे. तसेच पाणी जपून वापरावे, असे आवाहन पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे.




गुरूवार (दि.१७) खडकवासला जॅक्वेल (नवीन), नवीन पर्वती. जलशुध्दीकरण केंद्र (५०० एम.एल. डी.), जुने पर्वती जलशुद्धीकरण केंद्र व त्याअंतर्गत पर्वती एमएलआर टाकी परिसर, पर्वती एचएलआर टाकी परिसर व पर्वती एलएलआर टाकी परिसर, पर्वती टँकर पॉईंट, लष्कर जलकेंद्र, भामा आसखेड जॅक्वेल, वडगाव जलकेंद्र परीसर, खडकवासला जॅकवेल वारजे फेज क्र. १ व २, वारजे जलकेंद्र व त्या अखत्यारीतील एस.एन.डी.टी., एच.एल.आर. व टाकी परिसर चांदणी चौक टाकी परिसर, गांधी भवन टाकी परिसर, पॅनकार्ड क्लब जीएसआर

टाकी परिसर, वारजे जलकेंद्र लगत जीएसआर टाकी परिसर, खडकवासला रॉ वॉटर, गणपती माथा व जुने वारजे जलकेंद्र, एस.एन.डी.टी. (एच.एल. आर.) परिसर व चतुश्रृंगी टाकी परिसर तसेच कोंढवे - धावडे जलकेंद्र व रॉ वॉटर येथील विद्युत/पंपींग विषयक व स्थापत्य विषयक तातडीचे देखभाल दुरुस्तीचे काम असल्या कारणामुळे अत्यावश्यक देखभाल दुरूस्तींचे कामांसाठी उपरोक्त पंपींगचे अखत्यारीतील पूर्ण दिवसाचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

### पाणीपुरवठा बंद राहणारे भाग पुढील प्रमाणे

» शहरातील सर्व पेठा, दत्तवाडी परिसर, राजेंद्रनगर, लोकमान्यनगर, डेक्कन परिसर, शिवाजीनगर, स्वारगेट, पर्वती दर्शन, मुकुंदनगर, पर्वतीगाव, सहकारनगर, सातारा रस्ता, पद्मावती, बिबवेवाडी, तळजाई, कात्रज, धनकवडी, इंदिरानगर, कर्वेरस्ता ते एसएनडीटी परिसर, एरंडवणा, संपूर्ण कोथरूड परिसर, डहाणूकर कॉलनी, कर्वेनगर, लॉ कॉलेज रस्ता, सेमिनरी झोनवरील मीठानगर, भाग्योदयनगर, ज्ञानेश्वर नगर, साईबाबा नगर, सर्व्हे नं. 42-46 (कोंढवा खुर्द), पर्वती टँकर भरणा केंद्र, पद्मावती टँकर भरणा केंद्र, हिंगणे, आनंदनगर, वडगाव, धायरी, आंबेगाव पठार, दत्तनगर, भारती विद्यापीठ परिसर,कोंढवा बुद्रुक, पाषाण, औंध, बोपोडी, खडकी, चतु:श्रृंगी, गोखलेनगर, जनवाडी, रेंजहिल्स, बावधन, चांदणी चौक, किष्किंदा नगर, रामबाग कॉलनी, डावी-उजवी भुसारी कॉलनी, धनंजय सोसायटी, एकलव्य कॉलेज परिसर, महात्मा सोसायटी, गुरू गणेशनगर, पुणे विद्यापीठ परिसर, वारजे हायवे परिसर, वारजे-माळवाडी, रामनगर, अहिरेगाव, पॉप्युलर नगर, अतुलनगर, शाहु कॉलनी, वारजे जलशुद्धीकरण परिसर, औंध, बावधन, सूस, सुतारवाडी, भूगाव रस्ता परिसर, लष्कर भाग, पुणे स्थानक, मुळा रस्ता, कोरेगाव पार्क, ताडिवाला रस्ता, रेसकोर्स, वानवडी, हडपसर, महंमदवाडी, काळेपडळ, मुंढवा, येरवडा परिसर, विश्रांतवाडी, नगररस्ता, कल्याणीनगर, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड कॉलनी, वडगावशेरी, चंदननगर, खराडी, सोलापूर रस्ता, गोंधळेनगर, सातववाडी, विद्यानगर, टिंगरेनगर, कळस, धानोरी, लोहगाव, विश्रांतवाडी, विमाननगर, नगररस्ता परिसर आदी.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'मोदीबागेत' भेटी-गाठींना जोर

## राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्या अनेक शिलेदारांची शरद पवार यांच्या 'मोदीबाग' या निवासस्थानी भेट

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग येण्यास सुरुवात झाली असतानाच राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्या अनेक शिलेदारांनी मंगळवारी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची त्यांच्या पुण्यातील 'मोदीबाग' या निवासस्थानी भेट घेतली. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील, जुन्नरचे आमदार अतुल बेनके, भोसरीचे माजी आमदार विलास लांडे, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, भाजप नेते पृथ्वीराज जाचक यांच्यासह शेतकरी नेते रवीकांत तुपकर यांनी शरद पवार यांची भेट घेतली. त्यामुळे अजित पवार यांच्या कोणत्या शिलेदारांना पक्षात घेऊन शरद पवार त्यांना धक्का देणार, याबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.



लोकसभा निवडणूक निकालात वरचष्मा राहिल्याने राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश करण्यासाठी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षातील अनेक नेत्यांची चढाओढ सुरू झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनीही गेल्या काही दिवसात राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्यासह भाजपच्या काही नेत्यांना पक्षात प्रवेश दिला आहे. त्यामध्ये कोल्हापूर ग्रामीणचे भाजपचे नेते समरजितसिंह घाटगे, इंदापूरचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचा समावेश आहे. याशिवाय अजित पवार यांचे समर्थक रामराजे निंबाळकर हे ही राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. त्यातच जिल्ह्यातील अनेकजण शरद पवार यांच्या भेटीला आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या.

राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. मात्र पाटील पक्षात रहावे, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. त्यांना राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश दिला जाण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी ते शिवसेना (ठाकरे) पक्षात प्रवेश करणार असून ते मोहोळ मतदारसंघातील उमेदवार असतील, अशी चर्चा होती. मात्र पाटील यांनी शरद पवार यांची भेट घेतली. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील राजकीय परिस्थितीसंदर्भात पवार यांची भेट घेतल्याचे पाटील यांनी सांगितले.

शेतकरी संघटनेतून बाहेर पडल्यानंतर रविकांत तुपकर यांनी महाविकास आघाडीमध्ये जावे, असे त्यांच्या सहकाऱ्यांचा आग्रह होता. त्यानुसार तुपकर यांनी काही दिवसांपूर्वी शिवसेनेचे (ठाकरे) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे आणि प्रवक्ते संजय राऊत यांची भेट घेतली होती. त्यानंतर मंगळवारी त्यांच्या पवार भेटीमुळे ते महाविकास आघाडीतील कोणत्या पक्षात जाणार, याची चर्चा सुरू झाली. राज्यातील चोवीस जागांवर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा तसेच खानदेशातील काही जागांचा समावेश आहे. महाविकास आघाडीमध्ये कशा प्रकारे सामावून घेतले जाऊ शकते, यासंदर्भात ही भेट होती, असे तुपकर यांनी सांगितले.

### आमदार अतुल बेनकेंचा लवकरच पक्षप्रवेश?

» जुन्नरचे आमदार अतुल बेनकेही राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा काही दिवसांपासून आहे. पवार यांच्या जुन्नर दौऱ्यावेळी बेनके यांनी पवार यांची भेट घेतली होती. त्यानंतर मोदीबागेत त्यांची पुन्हा भेट झाल्याने ते लवकरच पक्ष प्रवेश करतील, या चर्चेने जोर धरला आहे.

न्यूज एक्सप्रेस मराठी



# विकास आराखड्याचे भवितव्य टांगणीला

## आता नव्या सरकारच्या काळातच होणार निर्णय : उच्च न्यायालयाची पुढील सुनावणी 21 ऑक्टोबरला

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यामध्ये सत्ता बदलाचे संकेत निर्माण झाले आहेत. त्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून निविदा माध्यमातून विकासकामांचा धडका लावला जात आहे. प्रत्यक्षात जिल्ह्याच्या विकासासाठी पीएमआरडीकडून प्रस्तावित विकास आरखड्यावर निर्णय होणे अपेक्षित असताना, न्यायालयीन कचाट्यात तो अडकला आहे. त्यावरती निर्णय न झाल्यास आचासंहितेमध्ये तो पुन्हा लटकू शकतो. पदसिद्ध अध्यक्ष या नात्याने मुख्यमंत्र्यांनी यात लक्ष घालणे आवश्यक होते, तर पीएमआरडीकडूनही विकास आराखड्यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत. प्रत्यक्षात डिसेंबर २०२२ प्रारूप आराखडा पूर्ण झाला होता. त्याबाबत दोनदा मुदतवाढ देऊनही अंतिम झाला नाही. अखेर पुन्हा महानगर नियोजन समितीने या विरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. आता तो पूर्ण होण्यास नव्या सरकारची वाट पाहावी लागणार आहे.




पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) प्रारूप विकास आराखड्याबाबतची सुनावणी ७ ऑक्टोबरला होती. ती आता २१ ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे आराखड्याचे भवितव्य लांबणीवर पडले आहे. दरम्यान, उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यास आणि तत्पूर्वी विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यास आराखड्याबाबत काय कार्यवाही होणार, याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे सत्ता बदल झाल्यास नवा सरकारमध्येच त्याबाबत कार्यवाही होईल, अशी अपेक्षा नियोजन समितीच्या सदस्यांनी व्यक्त केली. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता कधीही लागू होऊ शकते. अशा परिस्थितीत प्रारूप विकास आराखडा अंतिम होणार की नाही, याविषयी गोंधळाची स्थिती आहे.

> “ मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर आचारसंहिता लागू झाल्यानंतर पुढील सुनावणी झाल्यास आणि न्यायालयाने निर्णय दिल्यास प्रशासकीय स्तरावर त्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी लोकप्रतिनिधींची भूमिका जाणून घ्यावी लागणार आहे. जर प्रशासकीय स्तरावर निर्णय झाल्यास त्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली जाईल.
>
> - वसंत भसे, सदस्य, महानगर नियोजन समिती.

पीएमआरडीएच्या प्रारूप विकास आराखड्याबाबत हरकत घेणाऱ्या विविध याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल आहेत, महानगर नियोजन समितीचे सदस्य वसंत सुदाम भसे, सुखदेव तापकीर आणि दीपाली हुलावळे यांचे विविध आक्षेप आहेत. याबाबत दाखल याचिकांना अनुसरून मुंबई उच्च न्यायालयाने विकास आराखड्याबाबत 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सध्या या आराखड्याबाबत पुढील कोणतीही कार्यवाही झालेली नाही. गेल्या काही तारखांना पीएमआरडीएकडून वकील उपस्थित राहिले नसल्याने तारखा पुढे ढकलण्यात आल्या. त्यानंतर ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी होती. पुन्हा न्यायालयाने ती पुढे ढकलली. उच्च न्यायालयात २१ ऑक्टोबरला पुढील सुनावणी होईल.

दरम्यान, विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यास आणि आचारसंहिता काळात मुंबई उच्च न्यायालयाकडून अंतिम निर्णय झाल्यास या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासकीय स्तरावर करण्यासाठी आवश्यक कायदेशीर बाबी तपासाव्या लागतील, अशी माहिती पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.

# भारतातील पहिल्या संविधान भवनाची पायाभरणी

## आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा : पिंपरी-चिंचवड शहराच्या लौकीकात आणखी एक मानाचा तुरा

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश भारतीय लोकशाहीचा पाया संविधान अर्थात राज्यघटना आहे. या राज्यघटनेचा प्रचार, प्रसार आणि जनजागृती व्हावी. या करिता देशातील पहिले संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये उभारले जात आहे. त्याची पायाभरणी आज झाली. संपूर्ण पिंपरी-चिंचवडकरांना अभिमान वाटावा, असे संविधान भवन उभारले जाईल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) च्या पेठ क्रमांक 11 मध्ये संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्यात येणार आहे. त्याचे भूमिपूजन आज करण्यात आले. यावेळी माजी महापौर राहुल जाधव,




स्थायी समितीचे माजी अध्यक्ष नितीन लांडगे, संतोष लोंढे, विलास मडिगेरी, आरपीआयच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, हर्षवर्धन भन्ते, माजी नगरसेवक विकास डोळस, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, माजी नगरसेविका नम्रता लोंढे, संतोष कांबळे, अंबरनाथ कांबळे, सागर आंघोळकर, बाबा त्रिभुवन, बाळासाहेब ओव्हाळ, आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल व्हावळकर, बाळासाहेब भागवत, सखाराम बाप्पु डोळस, संदिपान झोबांडे, अजय निसर्गंध, कुंदन गायकवाड, चंद्रकांत डोळस, अमोल डोळस, भाऊसाहेब डोळस, विनोद (पिनु) डोळस, अनिकेत भुलाडे, अक्षय चव्हाण, प्रशांत बाराथे, गणेश सस्ते, अनिकेत सस्ते, राजेश सस्ते, महेंद्र गायकवाड, संजय वैरागर, निलेश बोराटे,

### पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब..

» विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरीत होवून शहरात संविधान तथा राज्य घटनेचा प्रचार, प्रसार व्हावा. यासह जगभरातील लोकशाही देशाच्या घटनांचा अभ्यास करता यावा, असा संकल्प आहे. संविधान जागृती आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची लायब्ररी उभारण्याच्या कामाला गती द्यावी, अशी सूचना महापालिका प्रशासनाला केली होती. संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये साकारले जात आहे, ही आम्हा पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया आमदार महेश लांडगे यांनी दिली आहे.

जितेंद्र गायकवाड, वंदनाताई आल्हाट, सागर हिंगणे, निखिल बोऱ्हाडे, मोशीतील आरपीआयचे अध्यक्ष गजेंद्र गायकवाड, रवि गायकवाड आदी उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, शहरात 2019 मध्ये पिंपरी-चिंचवड नवनगर प्राधिकरणाच्या माध्यमातून संविधान भवन उभारणीसाठी पाठपुरावा सुरू केला. त्यानंतर 'पीसीएनटीडीए'चे विलिनीकरण पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरणामध्ये करण्यात आले. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात सदर प्रकल्प लांबणीवर पडला. महायुतीची सत्ता आल्यानंतर २०२२ मध्ये पुन्हा या कामाला गती देण्यात आली. प्रस्तावित जागा 'पीएमआरडीए'कडून महानरपालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडेही आम्ही पाठपुरावा केला. आता संविधान भवनाचे भूमिपूजन झाले आहे, याचे विशेष समाधान आहे.

# सणासुदीच्या काळात भेसळीचा धंदा जोरात!

## पुणे जिल्ह्यामध्ये 7 लाख रुपये तर पुणे विभागात 3 लाख 34 हजार रुपयांचा भेसळयुक्त माल जप्त

**पुणे | प्रतिनिधी**

नवरात्र व दसरा काळात सार्वजनिक आरोग्य व जनहित विचारात घेता जनतेस स्वच्छ, निर्भेळ अन्न प्राप्त व्हावे यासाठी अन्न व औषध प्रशासनाने भेसळ करणाऱ्यांवर धडक मोहिम राबविण्यात आली. त्यामध्ये पुणे जिल्ह्यामध्ये ७ लाख रूपये तर पुणे विभागात ३ लाख ३४ हजार रूपयांचा भेसळयुक्त माल जप्त करण्यात आला. यावरून स्पष्ट होते की, पुण्यात भेसळयुक्त खाद्यपदार्थांचा कारभार चांगलाच जोरात आहे.

सणवार आले की, भेसळीचा धंदा तेजीमध्ये येतो. त्यामुळे सामान्य नागरिकांचे मात्र आरोग्य पणाला लावले जाते. सामान्य नागरिक बिनदिक्कतपणे गोड पदार्थ खरेदी करतात आणि सण साजरे करतात. परंतु, भेसळयुक्त पदार्थांमुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो, याची त्यांना कल्पना नसते.

अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नियमन अन्वये ही कारवाई करण्यात आली. पुणे जिल्ह्यात अन्न आस्थापनेच्या १० तपासण्या करण्यात आल्या. अन्न आस्थापनांमधून दुध, खवा, पनीर, स्वीट मावा, तूप, बटर व नमकीन इत्यादी अन्न पदार्थांचे एकूण १९ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. विश्लेषण अहवाल प्राप्त होताच कायद्याप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येणार आहे. तसेच भेसळीच्या संशयावरून विविध अन्न पदार्थांच्या धाडी घालून जप्ती करण्यात आली. पुणे कार्यालयाने गाईचे तुप, भेसळयुक्त बटर, स्वीट खवा, वनस्पती, भगर इत्यादी अन्न पदार्थांचा एकूण ७ लाख ४६० रूपये साठा जप्त करण्यात आला.



### येथे करा तक्रार!

नागरिकांना भेसळीसंदर्भात काही संशय आल्यास त्यांनी प्रशासनाच्या टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त सुरेश अन्नपुरे यांनी दिली.

### का होते भेसळ?

सणवार आला की, गोड-धोड खाद्यपदार्थांची मागणी वाढते. कारण सणाला गोड पदार्थांचीच सर्वत्र रेलचेल असते. परंतु, गोड पदार्थ तयार करण्यासाठी जे दुध, खवा, मावा लागतो, त्याचे उत्पादन नेहमीप्रमाणेच असते. मग अचानक सणवाराला मागणीच्या तुलनेत पुरवठा कसा होणार ? त्यामुळे मग भेसळ करून माल वाढविण्यात येतो. त्यामध्ये नागरिकांच्या आरोग्याचे मात्र तीन-तेरा वाजतात.

### नवरात्र-दसऱ्यात 10 लाखांची कारवाई

**» पुणे विभागामध्ये अन्न आस्थापनेच्या २८ तपासण्या करण्यात आल्या असून, अन्न आस्थापनांमधून दुध, खवा, पनीर, स्वीट मावा, तुप, बटर व नमकीन इत्यादी अन्न पदार्थाचे एकूण १५ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. संशयावरून विविध अन्न पदार्थाच्या धाडी घालून माल जप्त केला. पुणे जिल्हा व पुणे विभागात मिळून १० लाख ३५ हजार ३७८ रूपयांचा माल जप्त करण्यात आला.**

### गणेशोत्सवात 14 लाखांचा माल जप्त

**» पुणे शहरामध्ये गणेशोत्सव काळामध्ये अन्न आणि औषध प्रशासन विभागाने शहर, तसेच जिल्ह्यात कारवाई करून १४ लाख ३५ हजार रुपयांचे भेसळयुक्त खाद्यपदार्थ जप्त केले होते. या कारवाईत भेसळयुक्त तूप, बटर, पनीर, खवा, मिठाई असे खाद्यपदार्थ जप्त केले. पुणे विभागात भेसळीच्या संशयावरून १०१ विक्रेत्यांकडून खाद्यपदार्थांचे नमुने घेतले होते.**

“ दसरा-नवरात्रामध्ये भेसळ करण्याचे प्रमाण अधिक असते, म्हणून आम्ही खास पथके नेमतो. ही पथके संबंधित भेसळ करणाऱ्या दुकानांवर धाडी टाकतात. तेथील माल जप्त करतात आणि तो माल आम्ही प्रयोगशाळेत पाठवतो. तिथे भेसळ सिध्द झाल्यानंतर संबंधितांवर खटला भरला जातो.

**- सुरेश अन्नपुरे, सहआयुक्त, अन्न व औषध प्रशासन, पुणे.**

# प्रचारास प्रवेश बंदी! रस्ता नाही तर मतदान नाही

## अनेक वर्षांपासून रस्त्याचा प्रश्न मार्गी लागत नसल्याने कोऱ्हाळे बुद्रुक भागातील ग्रामस्थ संतप्त

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याचा प्रश्न मार्गी लागत नसल्याने कोऱ्हाळे बुद्रुक येथील रोहिदासनगर भागातील ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. रस्त्याचे काम होत नाही तोपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाला प्रचारासाठी येऊ देणार नाही, तसेच रस्त्याचे काम न झाल्यास मतदानावरही बहिष्कार टाकू, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. याप्रश्नी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र पवार यांनी आपला राजीनामा दिला.




वॉर्डातील समस्या सुटाव्यात, ग्रामस्थांना सोयीसुविधा पुरविता याव्यात यासाठी ग्रामपंचायत सदस्य झालो, परंतु आमच्या भागाकडे जाणारा रस्तासुद्धा करू शकलो नाही. अधिकाऱ्यांना वारंवार भेटलो, लोकप्रतिनिधींना विनंत्या केल्या. त्यांनीही आश्वासने दिली, परंतु प्रत्यक्षात रस्त्याचे काम झाले नाही. त्यामुळे आता सदस्य पदाचाही राजीनामा देत असल्याचे राजेंद्र पवार यांनी सांगितले.

रोहिदासनगर भागाकडे जाणारा रस्ता नगरभूमापन विभागाच्या सिटी सर्व्हेला नोंद आहे. परंतु प्रत्यक्षात वहिवाटीच्या या रस्त्यावर अडथळा निर्माण करण्यात आला आहे. या भागात राहणाऱ्या 30 पेक्षा अधिक कुटुंबांना घराकडे जाणे-येणेच मुश्किल झाले आहे.

पावसाळ्यात तर दुचाकी दुसरीकडे लावून घराकडे जावे लागते, इतकी परिस्थिती भीषण बनते आहे. रस्ता कायदेशीररीत्या खुला व्हावा यासाठी ग्रामपंचायत स्तरावरून पंचायत समितीकडे पाठपुरावा केला गेला.

अधिकाऱ्यांसोबत बैठकही झाली. 17 फेब्रुवारी 2022 ला झालेल्या बैठकीत रस्त्यावरील अतिक्रमण काढून तो खुला करून दिला जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. परंतु त्यानंतर कोणतीही कार्यवाही झाली नाही.

अधिकारी या विषयात लक्ष घालायला तयार नाहीत. स्वतःच्या वॉर्डातीलच अडचण सोडवू शकत नसल्याने नैतिक जबाबदारी म्हणून ग्रापंचायत सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याचे राजेंद्र पवार यांनी सांगितले.

त्यामुळे आता येणाऱ्या विधानसभेसह अन्य निवडणुकांमध्ये कोणत्याही पक्षाला प्रचारासाठी या भागात येण्यास ग्रामस्थांनी बंदी घातली आहे. शिवाय रस्ता होत नाही तोपर्यंत मतदानाला घराबाहेर पडणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या या इशाऱ्यानंतर आता प्रशासन काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.